# रिक्त पद भरण्याची कार्यवाही

१. रिक्त पद/नवीन पद भरण्यापूर्वी सदर पद आरक्षित आहे किंवा कसे हे ठरवावे.

२. सदर पद आरक्षित असल्यास ते भरण्याकरिता व्यापक प्रसिध्दीच्या वर्तमानपत्रात जाहिरात दयावी. जाहिरातीमध्ये पुढील तपशील असावा. (मोफत जाहिरात असू नये.)

अ) पद राखीव अगर कसे

ब) पदांची आरक्षणानुसार संख्या

क) पदांची अर्हता विषय इ.

ड) आरक्षण एकूण पदांना लागू करावे विषय निहाय आरक्षण निश्चित करता येणार नाही.

इ) अर्ज करण्याबाबत सविस्तर तपशील (अर्जाचा नमुना इत्यादी)

फ) अर्धवेळ / पुर्णवेळ वेतनश्रेणी मानधन इ. बाबत तपशील

३. अर्ज करण्याची मुदत मुलाखतीची निमंत्रणपत्रे, मुलाखतीचे रेकॉर्ड नेमणूक पत्रे, रुजू होणेबाबत मुदत, पत्रव्यवहार याबाबत काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

४. मागासवर्गीय उमेदवारासाठी पुढील कार्यालयाकडे प्रतिक्षा यादीची मागणी करण्यात यावी.

अ) जिल्हा समाजकल्याण विभाग

ब) आदिवासी विकास विभाग

क) जिल्हा सेवायोजन कार्यालय

ए) विद्यापीठ सेवायोजन कार्यालय

वरील कार्यालयाकडून प्रशिक्षित (अनुसूचित जाती / जमाती / वि.जा.भ.ज.) उमेदवार उपलब्ध झाले नाहीत. तर त्याच संवर्गातील अप्रशिक्षित उमेदवारांची नावे

मागवावीत व त्यापैकी उमेदवारांची नियुक्ती गुणवत्ततेनसार करण्यात यावी. कालापव्यय टाळण्यासाठी मागणीपत्रात प्रशिक्षित व अप्रशिक्षित उमेदवारांची मागणी करणे आवश्यक आहे. तसा उल्लेख जाहिरातीतही करणे आवश्यक आहे.

५. शासन निर्णय दिनांक १३.१०.२००० अन्वये जून २००० पासून रिक्त होणारे पद शिक्षण सेवक म्हणून भरावयाचे आहे. त्याकरीता सदर पद राखीव अथवा बिगर राखीव हे निश्चित करणे आवश्यक आहे.

६. आरक्षण ठरविण्यासाठी सहाय्यक आयुक्त, मागासवर्गीय कक्ष, आयुक्त कार्यालय यांनी तपासून प्रमाणित केलेले मागासवर्गीय प्रमाण दर्शविणारे कागदपत्रे सादर करावेत. सहाय्यक आयुक्त यांनी प्रमाणीत केलेल्या तारखेनंतर रिक्त होणा-या पदांचा व नेमणुकांचा तपशील सादर करणे आवश्यक आहे.

७. कोणत्याही परिस्थितीत मागास वर्गीय राखीव पदावर बिगर मागास उमेदवाराची नियुक्ती करता येणार नाही व त्याची मान्यताही मिळणार नाही. अशा शिक्षकांच्या वेतनाची जबाबदारी पूर्णपणे संस्थ्ेची राहील याची नियुक्ती करताना दक्षता घ्यावी.